# तिबेटमधली कैलास –मानस यात्रा – एक अविस्मरणीय अनुभव कसा घ्याल ?

१९८३ पासून २०११ पर्यंत गेल्या तीन दशकात तिबेटमधल्या कैलास आणि मानस सरोवराची पवित्र, सुंदर आणि अविस्मरणीय यात्रा करणाऱ्या भारतीयांची संख्या दिवसेंदिवस वाढतच जात आहे. महाराष्ट्राच्या भूमीत सह्याद्रीचे कडे–कपारे, दऱ्याखोऱ्या चढणाऱ्या व उतरणाऱ्या मावळयांना हिमालयाची गिरीशिखरे नेहमीच आव्हाने देतात आणि ती उमद्या मनाने स्विकारलीही जातात. तरीपण बंगाल, गुजरात, दिल्ली या प्रांताच्या तुलनेत महाराष्ट्रीयन यात्रींची संख्या कमी असते. याची कारणे अनेक आहेत. त्यापैकी एक म्हणजे या यात्रेसाठी सुयोग्य मार्गदर्शनाचा अभाव आणि राज्यसरकारची या गिर्यारोहण मोहिमेविषयीची उदासिनता होय.

सर्वसाधारणपणे अमरनाथ, वैष्णोदेवी, बद्रिनाथ, केदारनाथ, यमनोत्री, गंगोत्री या हिमालयातील स्थळांची तुलना कैलास यात्रेबरोबर केली जाते. परंतु या साऱ्या यात्रा मी सहा/सात वेळा केल्या आहेत आणि कैलास–मानससरोवर यात्रा दोन वेळा पूर्ण केली. ही अधिक खडतर पण सर्वाधिक निसर्गसौंदर्याने भरलेली आनंदयात्राच आहे. दरवर्षी जून ते सप्टेंबर या कालावधीत ३० दिवसांची ही यात्रा चीनने ताबा घेतलेल्या तिबेटमधली असल्याने पासपोर्ट, व्हिसा नि चीनचा डॉलरमधला यात्राकर इतर यात्रा खर्च सर्व मिळून ८० ते ९० हजार रुपये खर्च येतो. काही राज्यसरकार यातला भार उचलतात तर शासकीय कर्मचाऱ्यांना एक महिन्याची पगारी रजा मंजूर होते. अर्ज त्वरीत करायला हवा.

भारताच्या उत्तर सीमेवर सिंधू नदी पासून ब्रह्मपूत्रेपर्यंत २४०० कि.मी. पसरलेला हिमालय मी गेली तीस वर्षे फिरत आहे. हिमालयाच्या तीन रांगा असून उत्तरेला तिबेटचे विस्तीर्ण पठार आहे. त्याची उंची समुद्रसपाटीपासून १५ हजार फूट आहे. कैलास पर्वत तिबेटमध्ये असून त्याची उंची २२,०२८ फूट आहे. अनेक मोठ्या नद्यांचे ते उगमस्थान आहे. हिंदू, बौध्द व जैन या तिन्ही धर्माच्या लोकांचे ते महत्त्वाचे नि पवित्र स्थान आहे. सिंधू, करनाली, सतलज, ब्रह्मपुत्रा या नद्यांचे उगमस्थान असल्याने कोट्यावधी लोकांची जीवनदायी हे स्थान बनले आहे.

या ठिकाणी ३२५ चौरस किलोमीटर क्षेत्रफळाचे, स्फटिकवजा गोड्या पाण्याचे ३०० फूट खोलीचे सुंदर मानससरोवर आहे. तसाच विस्तीर्ण राक्षस तलावही आठ कि. मी. अंतरावर आहे. भारतातून पश्चिम तिबेटमध्ये जाण्यासाठी एकूण दहा पहाडी रस्ते आहेत. या प्रवेशद्वाराना खिंड किंवा पास म्हणतात. १) लिपूटेक २) दरमा ३) उंटाधुरा ४) निती ५) दामजाम निती होटिनिती ७) मानाखिंड ८) जेलुरवासा ९) सिपकी १०) जुजिला या सर्व खिंडी अल्मोडा, बद्रिनाथ, सिमला व काश्मीर भागातून आहेत. याशिवाय काठमांडू, नेपाळमार्गे कैलास–मानस यात्रेला घेऊन जाणाऱ्या काही प्रवासी खाजगी कंपन्या आहेत. परंतु भारत सरकारची परराष्ट्र व्यवहार मंत्रालयातर्फे जाणे किफायशीर व सर्वाधिक सुरक्षित होय. पूर्वी वृत्तपत्र, रेडिओ, टी.व्ही. द्वारे या यात्रेची सविस्तर माहिती व अर्जाचा नमुना प्रसिध्द होत होता. आता वेबसाईटवर ती माहिती उपलब्ध असते. वैद्यकीय तपासण्या पूर्ण करणे गरजेचे आणि अटळ असते.

या यात्रेची सुरवात दिल्लीतून होते. विदेश मंत्रालयाकडून चीनचा व्हिसा, डॉलर खरेदी व यात्रेविषयी सूचना दिल्या जातात. तिसऱ्या दिवसापासून प्रवास सुरु होतो. काठगोदाम, बागेश्वर, धारचूला असा प्रवास करुन यात्रेच्या बेस कँपपासून पायी वा घोड्यावरुन असा प्रवास सुरु होतो. आता बराच पुढेपर्यंत रस्ता झाला असून जीप/बसने मंगतीपर्यंत जाता येते. गाला–बुधी, लखीमपूर, मालपा, लमारी, गुंजी हा सारा भाग अतिशय निसर्गरम्यच आहे. आठ/नऊ दिवसात भारतातून लिपूखिंडीद्वारे तिबेटमध्ये प्रवेश होतो.

१२ व्या दिवशी आपण तकलाकोट या तिबेटमधल्या गावी पोहचतो. तेथून १२५ कि.मी. वरील तारचेनला बसने नेले जाते. प्रथम राक्षस तलाव आणि मग मानससरोवरचे दर्शन होते. कैलास प्रदक्षिणा व मानसप्रदक्षिणा केली जाते. डोलमा हे ठिकाण १९५०० फूट उंचीवर आणि यात्रेतील सर्वात उंच व कठिण ठिकाण. ते पार करताना कैलासचे अभूतपूर्व दर्शन होते. वाटेत लामा मिलारेपा या सिध्द तिबेटी लामांच्या ध्यानगुंफा लागतात. हे लामा ११ व्या शतकात होऊन गेले व त्यांचे बुध्दसंप्रदायात फार वरचे स्थान आहे. तर अष्टपाद हे ठिकाण जैन

धर्मीयांचे तीर्थस्थान आहे.वृषभदेवानी टाकलेली सात पावले म्हणजे सात मूल्ये होत. या ठिकाणी वृषभदेवाना निर्वाण प्राप्त झाले.

मानससरोवरची परिक्रमा पूर्वी घोड्यावरुन केली जायची. आता ती बसने केली जाते. १९८६ साली मी प्रथम ही यात्रा पूर्ण केली आणि पुन्हा २००1 साली पूर्ण केली. यामध्ये बऱ्याच सोई उपलब्ध आहेत. पूर्वीच्या तंबू ऐवजी पक्की घरे वाटेत यात्रेकरुंसाठी उपलब्ध आहेत. २१/२२ व्या दिवशी खोजरनाथ या २५ कि.मी. अंतरावरील श्रीराम, लक्ष्मण, सीता या मंदिराला नेले जाते. तेथून परतल्यावर तिबेटमधल्या बाजारात जाऊन यात्रेकरु शॉपिंगचा आनंद लुटतात. मग २३ व्या दिवशी परतीचा प्रवास सुरु होतो. ३० व्या दिवशू विदेशमंत्रालयाकडून हे गिर्यारोहण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र दिले जाते आणि अशा रितीने आपली ही आनंददायी यात्रा पूर्ण होते.

अर्थात या यात्रेमध्ये अडचणी नाहीत असे नाही. मध्ये मध्ये होणारा हिमवर्षाव, धबधब्यातून जाताना पाय घसरुन पडणे, लँड स्लाईड, याक किंवा घोड्यावरुन पडणे, प्रसंगी फ्रॅक्चर होणे, लिपूलेख, डोलमापास या उंचावरील खिंडीत प्राणवायूची कमतरता जाणवणे, चक्कर येणे, बदलत्या हवामानामुळे शरीर व मनावर परिणाम होणे या संकटावर मात करण्यासाठी यात्रेपूर्वी दररोज चालण्याचा सराव आवश्यक आहे.

## आणखी काही महत्त्वाच्या गोष्टी

आपण विदेश मंत्रालयाला अर्ज केल्यावर साधारण २५/३० दिवसांनी आपली निवड झाल्याचे कळवले जाते. जून ते सप्टेंबर या कालावधीत १६ बॅचेस पाठवल्या जातात. प्रत्येक बॅचमध्ये ४० ते ५० यात्री असतात. आपली निवड झाल्याची तार आल्यावर त्याचा स्विकार केल्याचे कळवा. कुमाऊ मंडल विकास निगम यांच्या नावे कळवल्याप्रमाणे ड्राफ्ट काढून पाठवा. माहिती पत्रकानुसार खालील वैद्यकीय तपासण्या करुन घ्याव्यात.

१. हिमोग्राम ESR, TLC, DSC, HB

२. मूत्रतपासणी  RE ALBUMIN SUGAR, मायक्रो स्किपींग

३. शौच तपासणी आर ई

४. रक्त तपासणी – जेवणापूर्वी व नंतरची साखर

५. छाती एक्सरे, ट्रेडमिल टेस्ट

याशिवाय पासपोर्ट बरोबर न्यावा. व्हिसा विदेशमंत्रालयाकडून तेथे ग्रुप व्हिसा मिळतो. या प्रवासासाठी २५ किलो सामान घेण्याची परवानगी असते. सामान खेचरावरुन नेले जाते त्यामुळे सुटकेस घेऊ नये. चेन असलेल्या कॅनव्हास बॅगस् घ्याव्यात  व अनेक प्लॅस्टीकच्या बॅगमध्ये कपडे घालावेत. त्यामुळे पावसापासून संरक्षण होईल. या यात्रेत उंचीसाठी लोकरीचे कपडे, हातमोजे, टोपी, स्वेटर वगैरे तसेच पाऊस, बर्फ याची शक्यता असल्याने रेनकोट, विंडचिटर, उत्तम पध्दतीचे हलके पण पाणी, बर्फ यापासून संरक्षण देणारे बूट, कॅमेरा घ्यावा. स्त्रियांनी पंजाबी ड्रेस वापरावा. नेहमीची औषधे, कॅमेरा, गॉगल, बिस्कीटस्, इलेक्ट्रॉल पावडर, लोणची हे पदार्थ ठेवावेत. कॉमन फंडामधून सूप पाकिटे व इतर साहित्य घेतले जाते.

कोल्हापूरला आता कैलास यात्री संघ स्थापन होऊन दहा वर्षे झाली. सन्मती मिरजे, सूर्यकांत गायकवाड यांनी त्याद्वारे अनेक इच्छुकांना मार्गदर्शन केले आहे. कैलास यात्रींचे लेख, अनुभव संकलित केले आणि अनेक ठिकाणी छायाचित्रांचे प्रदर्शनही भरवले. साद कैलासची... साथ सर्वांची ! अशी त्यामागची भूमिका आहे.

मग तरुण मित्रांनो, चला तर कैलास–मानस गिर्यारोहणाचा थरारक, अविस्मरणीय, सुंदर अनुभव घेऊ.

**– डॉ. सुभाष के. देसाई.**
**11 ब, शिवाजी स्टडियम, कोल्हापूर.**
**मो. 9423039929**
**इ–मेल:   drsubhashdesai@gmail.com**
**www.subhashkdesai.com.**